330

17


2021-22
SMP

VOLUME–VIII : ISSUE-I (February-2022)
ISSN :2455-4375

IMPACT FACTOR : 5.473 (SJIF)

# UPA
## Interdisciplinary e-Journal

Special Issue-VIII (February-2022) ISSN :2455-4375



UPA Group Publication

UPA National Peer-Reviewed - Refereed & Indexed Journal

CHIEF EDITOR
Dr. Anil Dodewar

EDITOR
Dr. Ghizala R. Hashmi
Dr. Siddharth Meshram
Prof. Mohammad Asrar

ASSOCIATE EDITOR
Dr. Sharad Meshram
Dr. Pranaya Patil

PUBLISHED BY:
UPA GROUP PUBLICATION
In Association With
Seth Kesarimal Porwal College of Arts and Science and Commerce, Kamptee

CORPORATE OFFICE:
38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

PUBLICATION :
The UPA Interdisciplinary e-journal is published Bi-annually.

© All Rights Reserved © The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of Journal or the body under whose auspices the journal is Published.

For downloading the Issue, Click the link given below
https://upa.org.in/special-issue.php?id=MTc=
Visit : www.upa.org.in

Share your valuable feedback at
upanagpur@gmail.com
upajournal@gmail.com

UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal
Published By
UPA Group Publication
In Association With
SETH KESARIMAL PORWAL COLLEGE OF ARTS AND SCIENCE AND COMMERCE
KAMPTEE (NAGPUR)

330

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7 | डॉ. तनुजा नाफडे<br>आर.एस.मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर. | गुरुमोल मंत्र जाणाया। | 31-35 | PDF | |
| 8 | प्रा.दिपकराव बाबुराव देवरे<br>पंकज कला व विज्ञान महाविद्यालय चोपडा जि. जळगांव<br>प्रा. डॉ. एस. पी. ढाके<br>कै. म.दि.सिसोदे उर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय नरडाणा ता.शिंदखेडा जि. धुळे | दहशतवाद रोखण्यासाठी भारताने केलेले कायदे व सुरक्षा | 36-38 | PDF | |
| 9 | प्रा.डॉ. धनंजय गभणे<br>समर्थ महाविद्यालय, लाखनी, त. लाखनी, जि. भंडारा | महाराष्ट्रातील ग्रामिण भागातील महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासातील योगदान | 39-42 | PDF | |
| 10 | प्रा.डॉ.मेघराज रा. शिंदे<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | आदिवासी विकासाचे दृष्टिकोन | 43-46 | PDF | |
| 11 | प्रा. सौ. वैशाली रा. मोरे<br>श्रीमंती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महा. मेहकर जि.बुलडाणा | समतोल आहाराचे महत्व व आहारीय समस्यांचे निराकरण | 47-50 | PDF | |
| 12 | प्रा. डॉ. सविता माधवराव पवार<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय | तहान कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास | 51-54 | PDF | |
| 13 | प्रा. डॉ. वैशाली गभने (सुरकार)<br>लक्ष्मीबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, मांगली (खापा) | झाडीबोलीतील उखाण्यातील कृषिदर्शन | 55-58 | PDF | |
| **Section:- Hindi** | | | | | |
| 1 | डॉ. मिनाक्षी वाणी<br>एल.ए.डी. अॅन्ड श्रीमती आर.पी हिला महाविद्यालय शंकरनगर नागपुर | साठोत्तरी हिंदी ग़ज़लों में सौंदर्य | 1-5 | PDF | |
| 2 | डॉ इफ्तेखार आर हुसेन<br>एस. के. पोरवाल कॉलेज ऑफ आर्ट्स एंड साइंस एंड कॉमर्स, कामठी | उभरते बाज़ारों पर ई-कॉमर्स का प्रभाव | 6-11 | PDF | |
| 3 | डॉ. सी. पी. गुप्ता<br>स्वामी विवेकानंद शासकीय स्नातकोत्तर महाविद्यालय, हरदा | मुंशी प्रेमचंद की कहानियों में राष्ट्रीय चेतना | 12-16 | PDF | |
| 4 | **Dr. Azhar Abrar Ahmad**<br>Seth Kesarimal Porwal College, Kamptee | Vidarbha Ke Jadeed Urdu Shora e Karam | 1-5 | PDF | |
| 5 | **Dr. Mubeen Nazeer**<br>MGV'S Arts, Commerce and Science College Malegaon City | Ishq e Nabi ki Meeraj- Fi Shaan e Habib | 1-6 | PDF | |

IMPACT FACTOR 5.473(SJIF) | UPA NATIONAL E-JOURNAL Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal Volume -8 : Issue-1 (February-2022) | ISSN 2455-4375

# तहान कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय
मेहकर, जि.बुलडाणा

**प्रस्तावना:**

'तहान' ही सदानंद देशमुख यांची महत्त्वाची कादंबरी आहे . उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ग्रामीण भागामध्ये पाण्याचे कसे दुर्भिक्ष्य पाहायला मिळते त्याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीमध्ये येते.या कादंबरीतील प्रत्येक प्रसंगामागे, घटनेमागे पाण्याचा प्रश्न दिसत राहतो. विचार करायला लावणारे ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण प्रस्तुत कादंबरीमध्ये करण्यात आले आहे . पाण्याचा प्रश्न 'तहान' कादंबरीमधून मांडताना जे कथानक घडत जाते, त्यात अर्थात कादंबरीतील व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण ठरतात. प्रस्तुत कथानकामध्ये शेतीवर व आपल्या बैलांवर अतीव प्रेम करणारा राघोजी शेवाळे, पाण्याचा धंदा करणारा बबन शेवाळे, स्थानिक वार्ताहर प्रमोद नवले , पोलीस शिपाई सोमनाथ हावरे, बबनची आई रामकोर, बहीण वर्षा आणि बबनशी प्रेमसंबंध ठेवणारी रत्ना या काही ठळक व्यक्तिरेखा आहेत. मोजक्याच व्यक्तिरेखांच्या आधारे लेखकाने कथानक आणि पाणीटंचाईच्या समस्येला अतिशय प्रभावीरित्या मांडले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'तहान' कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**तहान कादंबरीतील पुरुष व्यक्तिरेखा:**

**राघोजी शेवाळे:**

सदानंद देशमुख यांच्या तहान या कादंबरीमध्ये मोजक्याच पुरुष व्यक्तिरेखा आहेत. काही गौण व्यक्तिरेखांवरसुद्धा लेखकाने अशी मेहनत घेतली आहे की,त्या सजीव होऊन उठतात. लेखक व्यक्तिरेखांच्या संदर्भात जास्त बोलत नाहीत पण त्या व्यक्तिरेखा जे बोलतात, वागतात, त्यांच्या व्यवहारातून त्यांचा स्वभावधर्म प्रकट होतो. राघोजी शेवाळे ही या कादंबरीतील प्रधान व्यक्तिरेखा आहे. कृषिसंस्कृतीचा तो प्रतिनिधी आहे. शेतात राबराब राबणारा, कष्ट करणारा राघोजी शेवाळे आपल्या मातीशी, कष्टाशी प्रामाणिक आहे. आपल्या बैलांवर तर त्याचे नितांत प्रेम आहे. त्यांच्याविषयी असलेल्या कृतज्ञतेच्या भावनेतून तो बैलांना जीवापाड जपतो, त्याची काळजी घेतो. कादंबरीमध्ये राघोजी प्रथमत: जो भेटतो तोच मुळी वैतागलेला दिसतो. दावणीला बैलं नाहीत असे पाहिल्यावर अस्वस्थ होतो. भर दुपारी गाडीला जुंपून त्यांना पाणी भरून आणण्यासाठी नेले, ही गोष्ट त्याला जिव्हारी लागते. आपल्या बैलजोडीविषयी मुरल्या- छबिल्याविषयी त्याला वाटणारी अपार काळजी वारंवार दिसते.

पत्नी रामकोरचे घालून पाडून बोलणे त्याला असह्य होत असते. वैतागून तो एक दिवस तिच्या तोंडात मारतो, त्याच्याही नकळत हे घडते.परंतु तोच पराभूतासारखा घायाळ होतो. लेखकाने अगदी प्रारंभीच पती-पत्नीमधील हा बेबनाव वर्णन केला आहे. कादंबरीमध्ये कोणतेही चित्रण भडक होणार नाही याची पूर्ण काळजी लेखकाने घेतलेली दिसते. 'चोपड चापड खाऊन लठ्ठ झालेल्या बायकोला पाहताना राघोजीच्या मनात कामभावना जागी होत नाही, हे त्याच्या मन:स्थितीशी अत्यंत सुसंगत आहे, ती त्याचा घडोघडी पाणउतारा करते, त्याला तिच्याबद्दल असलं काही वाटणारच नाहीये. पण समजा, असलं काही त्याला वाटलं असं दाखवून, त्यानं त्या दृष्टीने पुढचं पाऊल टाकताच रामकोर त्याचा आणखी पाणउतारा करील, असं सदानंद देशमुख यांना दाखवता आलं असतं. पण असल्या भडक किंवा स्वस्त चित्रणाचा मोह लेखक म्हणून सदानंद देशमुख यांनी टाळला आहे,'१ राघोजी हा सरळ साधा आहे. मुक्या जीवाची कदर करणारा कष्टकरी शेतकरी आहे आपली सुखाची चटणी-भाकरी बरी असे समजून जीवन जगणारा आहे. पाण्याचे पैसे करणारा बबन आणि त्या पैशांमुळे सुखावणारी रामकोर यांच्या वागण्यामुळे हैराण झालेला राघोजी त्यांना समजावण्याचा प्रयत्न करत असतो. पण पालथ्या घड्यावर पाणी असाच अनुभव त्याला येतो. तो म्हणतो ,"पण आखर शेवटी ही तकलादूच कमाई हाये नं! बारोमास पोसणारं वावरच कामी हाये आपलं. रोजचा खडा कामी हाये. पण एक दिवसाचा घडा कामाचा न्हाई......"२ त्याच्याजवळ दूरदृष्टी आहे .काळ्या मातीमध्ये त्याचे पाय घट्ट रोवलेले दिसतात. बैलांसाठी ठेवलेला

चारा कोणीतरी पेटवून दिला, तेव्हा राघोजीचा आकांत काळीज पिळवटून टाकणारा आहे ; तरी आपला कडबा कोणी मुद्दामहून जाळला असेल असे त्याला वाटत नाही. अनुमान धपवया कोणाकडून तरी बिडीचा गुल उडाला असेल असे त्याला वाटते, एवढा तो सरळ मनाचा आहे. आपला मुलगा पाण्याचा धंदा करतो याची त्याला होणारी वेदना सतत जाणवत राहते. त्याच्या या धंद्यामुळे बैलांना त्रास होतो, बैलांचा हा त्रास वाचावा म्हणून पाणीटंचाईची समस्या लवकर सुटावी असे त्याला वाटत असते. त्यामुळे गावात घागर मोर्चा निघणार याचा त्याला आनंद होतो पण रामकोरला मात्र दुःख होते. पैशाचा मोह त्याला नाही त्यापेक्षा आपली शेती आणि बैलाची काळजी त्याला महत्त्वाची आहे. घंगत चाललेले बैलं पाहून त्याला त्रास व्हायचा. त्याच्या बैलांसारखाच तोसुद्धा खंगत गेलेला आपल्याला दिसतो.

बबन शेवाळे :

बबन शेवाळे ही व्यक्तिरेखा सुद्धा या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे .बबन शेवाळे तरुण पिढीचे प्रतिनिधित्व करणारा ग्रामीण तरुण आहे. शेतीवर व शेतासाठीच्या कष्टावर त्याचा विश्वास नाही. उन्हाळ्याच्या दिवसात पाणी टंचाईच्या काळात गारमाळ्यात जाऊन तो पाणी आणत असतो . देवराव बापूच्या गारमाळयातील विहिरीवरून पाणी आणणे कठीण काम. पण हे काम बबन मोठ्या हिमतीने करतो. पाण्याचा पैसा ही करता येतो याचा अनुभव त्याला येतो आणि मग पाण्याचे पैसे करण्यात तो गुंग होऊन जातो. पैसे मिळवून देणारे साधन बैलजोडी त्याच्याकडे आहे. पाणी विकण्याचे काम करताना आपल्या वडिलांना होणाऱ्या वेदना त्याच्या मनापर्यंत पोहोचत नाहीत. हातात पैसा खुळखुळायला लागतो आणि तो वेगळ्या विश्वात वावरायला लागतो. पाणीटंचाईच्या प्रश्नाचा फायदा उचलतो. शेतीकडे त्याचे पूर्ण दुर्लक्ष आहे. उन्हाळ्याचे दिवस आहे शेती तयार करावी लागेल हे विचार त्याच्या डोक्यात नाहीत. पैसे मिळविण्याचा मार्ग त्याला सापडला आणि जोपर्यंत तो ठेचाळत नाही तोपर्यंत त्याच्या डोळ्यांवरची धुंदी उतरत नाही. पैसा मिळविण्याच्या नादात तो मूल्ये हरवून बसला आहे. वडिलांचे तो ऐकत नाही. चैन, सुख मिळायला लागल्यामुळे हरखून गेलेली माय आणि तिचा पाठिंबा त्याला जवळचा वाटतो. त्याचा अनुभव कमी आहे आणि दूरदृष्टीचा अभाव आहे. त्यामुळे स्वप्नमय विश्वात तो हरवत जातो. रत्नासारख्या मुलीचा गैरफायदा तो घेतो आणि एका पिंजऱ्यात अडकत जातो. आपण जे वागलो ते सारेच निरर्थक त्याला वाटायला लागते. समोर त्याला मार्गही दिसत नाही आणि आपले मन मोकळे करायला त्याच्या आजूबाजूला कोणी नाही. त्याच्या जीवनात तो प्रचंड एकाकी वाटतो. त्या तुलनेत राघोजी शेवाळे आपल्या मनातले कोणाकोणा जवळ बोलत असतो. आपल्याला होणारा त्रास बोलून दुःखाला मोकळी वाट करून देतो . आपल्या चोरट्या व गूढ वागण्यामुळे बबन आपली व्यथा कुणाजवळही बोलू शकत नाही. त्याला पश्चातापही चांगलाच होतो पण त्यानंतरचा मार्ग कोणता हे निश्चित त्याला दिसत नाही. वाचकांसमोरही हे एक गुढ राहते. तो तसा वाईट नाही, पण परिस्थितीच्या पिंजऱ्यात सापडल्यामुळे मोकळा श्वासही त्याला घेता येत नाही. त्याचे पुढे काय होणार हा एक घोर वाचकांच्या मनाला लावण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

राघोजी आणि बबन ह्या दोन टोकाच्या दोन व्यक्तिरेखा आहेत. राघोजी आपली मूल्ये जपणारा आहे तर बबन त्याच्याही नकळत मूल्यांना पायदळी तुडवत आहे. किंबहुना त्याच्याजवळ निश्चित असे मुल्यच नाही आणि त्यामुळेच तो वाहवत गेला आहे. पाण्याच्या एका प्रश्नातून स्वतःच्या घराला त्याने प्रश्नांच्या गर्तेत आणून टाकले आहे. स्थिर जीवनाला अस्थिर करून टाकले आहे. परस्परविरोधी वागण्यामुळे या दोन्ही व्यक्तिरेखा उठून दिसतात. लेखक सदानंद देशमुख यांनी कथानकात या दोन्ही व्यक्तिरेखांना योग्य तो न्याय दिलेला दिसतो. कादंबरीतील इतर पुरुष पात्रे ही गौण पात्रे आहेत, तरीसुद्धा कथानकात त्यांचे स्थान महत्वपूर्ण आहे . कथानकाला प्रवाही ठेवण्यात त्यांचाही महत्त्वाचा सहभाग आहे. भगवान होगे, नंदू आळशी काही प्रसंगांमध्ये येत राहतात. प्रसंगातली उभे आडवे धागे विणायला मदत करतात. प्रमोद नवले, सतीश मंगळे हे गावातील पदवीधर परंतु नोकरी न मिळाल्यामुळे गावातच आहेत. वेल्डिंगचे काम करून सतीश मंगळे आपले घर चालवतो तर प्रमोद नवले हा स्टेशनरी दुकान चालवतो. 'जनवार्ता' वर्तमानपत्राचे तो वार्ताहर आहे. सोमनाथ हावरे सारंगपूरच्या पोलीस स्टेशनमध्ये पोलिस आहे. यांच्या सोबत असणारा मोहन काळे हा गावातील बातम्या एकडच्या तिकडे करत असतो . कोण काय चुकीचे काम करतो याकडे प्रमोद नवले, सोमनाथ हावरे आणि मोहन काळे यांचे लक्ष असते. त्याचा आपल्याला कसा फायदा करून घेता येईल असे ते पाहत असतात, त्यांच्याकडून पैसे

लुबाडण्याचे काम ते करतात आणि त्यांच्याच जाळ्यात बबन अडकत जातो. त्याला धाक दाखवून हे त्रिकुट त्याच्याकडून पैसे लुटते .या व्यक्तिरेखा लहान असल्या तरी कथानकाचा महत्त्वपूर्ण भाग राहिल्या आहेत. लेखकाचे वैशिष्ट्य हे की, ते जसे मुख्य पात्राला रंगवतात त्याचप्रमाणे गौण व्यक्तिरेखा सुद्धा तेवढ्याच ताकदीने उभ्या करतात. त्यातून ग्रामीण जीवनाचे बारकावे, माणसाच्या वेगवेगळ्या तऱ्हा लक्षात येत राहतात.

**तहान कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा:**

लेखक सदानंद देशमुख यांच्या 'तहान' कादंबरी मध्ये येणारी स्त्रीपात्रे ही अर्थात ग्रामीण भागातील आहेत. त्यांच्या प्रेरणा ह्या रोजच्या जगण्याशी संबंधित आहेत, सीमित स्वरूपाच्या आहेत. रामकोर म्हणजे बबनची आई आणि राघोजी शेवाळे यांची पत्नी, वर्षा ही बबनची बहिण, रत्ना ही गावामध्ये झोपडपट्टीत राहणारी एक तरुणी आहे. ही काही स्त्रीपात्रे या कादंबरीत भेटतात. रामा उमाळ्याची तेरा वर्षांची मुलगी पाणी आणण्यासाठी जाते आणि विहिरीत पडून मरते. घरी, शेतात राबराब राबणाऱ्या अशा या स्त्रिया आहेत. पाण्यासाठी त्या वणवण फिरताना दिसतात. पाणीटंचाईच्या काळात पाण्याचा जपून वापर करतात. रामा उमाळेच्या अल्पवयीन मुलीचा मृत्यू चटका लावणारा आहे. घरातल्या स्त्रिया, मुली पाणी भरण्यासाठी कष्ट घेतात, पाण्यासाठी भल्या पहाटेच उठतात. पाण्यासाठी द्वारका आणि तारा यांच्यामध्ये मारामारी सुद्धा होताना दिसते.

रत्ना दिसायला सुंदर आहे, तरुण आहे. तिच्याही डोळ्यांसमोर कोणती मूल्ये अशी दिसत नाहीत. जगण्याशी संबंधित प्रश्नच त्यांच्या जीवनात महत्त्वाचे ठरतात. बबनजवळ असलेला पैसा आणि पाण्याच्या अपेक्षेची त्याच्याकडून होणारी पूर्तता तिला महत्वाची वाटते. त्यापुढे आपले स्वत्व तिला मोठे वाटत नाही. सारासार विवेक जसा बबनजवळ नाही तसा तो रत्ना जवळ सुद्धा दिसत नाही.राधी आणि गोदी या तरुणीही पाण्यासाठी बबनची वाट पाहताना दिसतात. वर्षा ही बबनची बहिण, घरातील सर्व कामे करताना दिसते. घरात पंखा, टी.व्ही. येतो, याचे तिला अप्रूप वाटते. बापाविषयी तिचे मन मात्र तळमळत असते. गावात टँकरने पाणी यायला लागल्यानंतर विहिरीवर जाऊन धडपड करून ती पाणीसुद्धा आणते. ववर्षा ही कष्टाळू वृत्तीची आहे आणि सरळ स्वभावाची आहे.

**रामकोरची व्यक्तिरेखा:**

रामकोर ही भांडखोर, जिभेला लगाम नसलेली अशी स्त्री आहे. आता आपला मुलगा चांगला कमवायला लागला याचा तिला अहंकार आलेला दिसतो. त्यामुळेच आपल्या पतीला बोलताना तिची जीभ कचरत नाही. घालून पाडून बोलताना ती जरासुद्धा दुसऱ्यांच्या भावनांचा विचार करताना दिसत नाही. नवऱ्याला काहीच किंमत न देणारी अशी ही स्त्री आहे. राघोजीला ती म्हणते," काई पाळलं न पोसलं नाई हो तुम्ही मले. सुरत पहा पोसणाराची. मेंध्या तोंडाची...... रातन दिवस ढोरावानी राबत व्हते म्हन्लं मी. तुमालेबी म्याच पोसलं वावरात काम करू करू...... तुम्ही त निरानाम त्या बैलायच्याच ध्यानी राहत. बायको पोरापेक्षा तुमाले त्या कातड्यायचीच जास्त चिंता व्हती . म्हणून म्हन्ते आता तुमी नाई महा बबन्या पोसून राह्यला मले.......... समजलं?"३

बबन पैसा कमावतो त्यातून ती सोन्याची पोत करते. घरात आलेला टी.व्ही. पंखा यावर ती खूश आहे. मटण खायला मिळते, वरण भात खायला मिळतो यात तिला सुख वाटायला लागते. परंतु शेतात कष्ट करणारी ही स्त्री आहे आणि तिला आपल्या शेताची, बैलांची काळजी मात्र वाटत नाही, याचे अप्रूप वाटते. आपल्या बैलांसाठी जसा राघोजीचा जीव तुटतो, तसा तिचा तुटत नाही; उलट उन्हात वितळायला बैल काय मेणाचे आहेत का? असा तिचा प्रश्न आहे. संपूर्ण कादंबरीमध्ये ती नवऱ्याचा अनादर करताना दिसते. बबनचे दिवस पालटतात, त्यामुळे तिचा मात्र वैताग होतो. आयुष्यात कष्ट उपसणारी ही स्त्री आहे पण आता सुखाची तिला अपेक्षा वाटायला लागते. सोने-नाणे, चांगले खाणे, घरातल्या सुखवस्तू, हातात येणारा पैसा यातच ही स्त्री सुख शोधायला लागते. दूरदृष्टीचा अर्थातच तिच्या जवळ अभाव आहे. स्वतःचे सुख बघण्यापलिकडे तिच्या हातून काहीही घडताना दिसत नाही. या कादंबरीतील स्त्रिया ह्या पाणी भरण्याचे कष्ट करताना दिसतात. मग वर्षा असेल वा रत्ना, इतर व्यक्तिरेखा असतील त्यांच्यापुढे पाण्याचा प्रश्न महत्वाचा दिसतो. वर्षा वगळता इतर स्त्री व्यक्तिरेखा ह्या भांडखोर आहेत. भांडण तंटा करणे, चेष्टा मस्करी करणे या पलीकडे त्यांची पोच नाही. ह्या स्त्रिया ग्रामीण भागातील आहेत. त्यांच्यापुढचे प्रश्न वेगळे आहेत. त्यामुळे स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण ,अस्मिता, स्त्रीवाद वगैरे प्रश्न या स्त्रियांना पडत नाहीत, अशा प्रकारचे त्यांचे वागणे नाही. पुरुषांच्या छायेखाली वावरणाऱ्या या स्त्रिया

IMPACT FACTOR
5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal*
*Volume -8 : Issue-1 (February-2022)*

ISSN
2455-4375

आहेत पण त्यांच्या शिवाय कादंबरीचे कथानक सुद्धा पूर्ण होऊ शकत नाही. ह्या स्त्री व्यक्तिरेखा विशिष्ट चौकटीतच वावरत असल्या, त्यांची क्षमताही मर्यादित असली तरी अगदी राधी- गोदी सारख्या व्यक्तिरेखा सुद्धा आपला वेगळा ठसा या कादंबरीमध्ये टाकताना दिसतात.

**समारोप:**

लेखक सदानंद देशमुख यांच्या तहान कादंबरीमध्ये कमीत कमी व्यक्तिरेखांच्या आधारे कथानक गुंफले आहे. या कादंबरीमध्ये पुरुष व्यक्तिरेखा जशा कमी आहेत त्याचप्रमाणे स्त्री व्यक्तिरेखासुद्धा कमी आहेत. त्यामुळे वाचक सर्व व्यक्तिरेखांना व्यवस्थितरित्या ओळखू शकतो, पारदर्शीपणे पाहू शकतो. वाचक व्यक्तिरेखांच्या गर्दीत हरवण्याची वा कथानक हरवण्याची शक्यता या कादंबरीमध्ये नाही. ह्या व्यक्तिरेखा कथानकाला न्याय देतात. पुरुष व्यक्तिरेखांबरोबरच स्त्री व्यक्तिरेखा सुद्धा लेखकाने अतिशय कौशल्याने जिवंत वाटाव्यात अशा रेखाटल्या आहेत. कादंबरीतील गौण व्यक्तिरेखा सुद्धा त्यांच्या ठसठशीतपणाने उठून दिसतात. कादंबरीतील सर्व व्यक्तिरेखा वास्तवदर्शी आहेत. आपला तोल सांभाळून या व्यक्तिरेखा कादंबरीमध्ये वावरतात. त्यांच्या जगण्याच्या ज्या प्रेरणा आहेत त्यानुसार त्यांचे वर्तन घडते. ग्रामीण ढंगाच्या ह्या व्यक्तिरेखांचा कादंबरीतील वावर अगदी सहज असा आहे. तहानमधील ही पात्रे जशी साधी सरळ आहेत तशीच काही पात्रे बेरकी सुद्धा आहेत. परिस्थितीच्या गर्तेत या कादंबरीतील पात्रे सापडतात आणि त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांना दिसत नाही. आपल्याला बबन, राघोजी आणि रामकोर ही पात्रे परिस्थितीच्या हातचे बाहुले बनताना दिसतात. त्यासाठी त्यांचा स्वभावही तितकाच कारणीभूत असलेला आपल्याला दिसतो. एकंदरीत 'तहान' कादंबरीमध्ये शेवटी पाण्याचा प्रश्न तात्पुरता मिटत असला तरी ही पात्रे मात्र तहानलेलीच दिसतात. त्यांच्या मनाची तडफड ही वाचकाला सुद्धा अस्वस्थ करीत राहते.

**संदर्भ टीपा :**

- रंगनाथ पठारे, आजची कादंबरी :नोंदी आणि निरीक्षणे, श्रीरामपूर, आवृत्ती पहिली २०१४, पृ. क्र.१६८
- सदानंद देशमुख, तहान, सुधारित आवृत्ती २०१७, पुणे, पृ. क्र.२८
- तत्रैव, पृ . क्र. १०

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana